आर.सी.एस क्र.०२/२०२२
राणी वि..राजेश
नि.क्र.५९

**प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्र.०२ यांचा सरतपास**
देवाची शपथ खरे सांगतो

नाव -यामीनी प्रभु रामटेके,
वय-३८ वर्षे, व्यवसाय-तलाठी (परसोडी),
रा.प्रतापनगर, नागपुर.

**सरतपास शपथेवर प्रतिवादी तर्फे अॅड.श्री डी.आर.गलांडे यांच्या मार्फत सुरू.**

**१.** मी आजरोजी परसोडी तह.उमरेड येथे तलाठी म्हणुन कार्यरत आहे. माझ्या अधिकारक्षेत्रातील जमीनीच्या अधिकार अभिलेख पंजी माझ्या कस्टडीमध्ये आहे. गट नंबर १६ व १८ मधील जमीनीची अधिकार अभिलेख पंजी मागितली होती. त्यानुसार मी सदर गटांची अधिकार अभिलेख पंजी सोबत आणलेली आहे. आता मला सदर गट न.१८ दि.२७.०४.२०२६ रोजीची अधिकार अभिलेख पंजीची सत्यप्रत जी मुळ रेकॉर्डप्रमाणे आहे, ती दाखविण्यात आली ती तीच आहे, त्यातील मजकुर मी सोबत आणलेल्या मुळ रेकॉर्डप्रमाणे खरा व बरोबर आहे त्यास **नि.क्र.६०** देण्यात आला. सदर नि.क्र.६० मध्ये मुळ रेकॉर्डप्रमाणे किसन गणबाजी सोनटक्के, गोपिचंद वारलु शामकुंवर आणि अभिमन बारू तुरूपकार रा.हळदगांव यांनी मोहन परसराम पटवर्धन यांच्याकडुन गट नं.१८ खरेदी केल्याचे नमुद आहे.

**२.** सदर गट नं.१८ चे एकुण क्षेत्रफळ ७ हेक्टर असे मुळ रेकॉर्डप्रमाणे व नि.क्र.६० प्रमाणे नमुद आहे. नि.क्र.६० व मुळ रेकॉर्डप्रमाणे सदर गट नं.१८ च्या जमीनीची खरेदी खताच्या वेळेची किंमत एकूण ४,०००/- अशी नमुद आहे. सदर मुळ रेकॉर्डप्रमाणे व नि.क्र.६० प्रमाणे फेरफार झाल्याची तारिख ही दि.१२.०३.१९६५ अशी नमुद आहे.

**३.** आता मला नि.क्र.२८ वरिल गट नं.१६ च्या ७/१२ च्या उता-याची प्रमाणित प्रत दाखविण्यात आली. त्याप्रमाणे गोपिचंद वारलु शामकुंवर यांचे नाव ७/१२ ला नोंद असुन त्यांच्या ७/१२ ची आराजी ही २.९९ हे.आर. अशी नमुद आहे.

**४.** आता मला नि.क्र.२९ वरिल गट नं.१८ च्या ७/१२ च्या उता-याची प्रमाणित प्रत दाखविण्यात आली. त्यामध्ये भोगवटदाराचे नाव  गोपिचंद वारलु शामकुंवर असे असुन सदर ७/१२ ची आराजी २.९९ हे.आर. अशी नमुद आहे.

**५.** नि.क्र.६० प्रमाणे अधिकार अभिलेख मध्ये मोहण परसराम पटवर्धन यांच्या नावे १/२/घ. आराजी ०.३८ हे.आर आणि ४/१ आराजी ७ हेक्टर अशी एकूण ७.३८ हेक्टर आर क्षेत्रफाची नोंद आहे व तशी नोंद ही मुळ रेकॉर्डप्रमाणे व नि.क्र.६० प्रमाणे नमुद आहे. आता मला नि.क्र.२९ व नि.क्र.६० दाखविण्यात आला. नि.क्र.२९ प्रमाणे सर्व्हे क्र.१८ ची रि-सर्व्हे नंबर नुसार अधिकार अभिलेख सादर केलेला आहे तो नि.क्र.६० हा आहे. नि.क्र.६० आणि नि.क्र.२९ प्रमाणे जुना सर्व्हे नंबर ४/१, १/२/घ. हा अधिकार अभिलेखमध्ये नमुद केलेला आहे. सदर नि.क्र.६० प्रमाणे त्यामधील शेत गट न.४/१ आणि १/२/घ. हे गट नंबर अधिकार अभिलेख नि.क्र.६० मध्ये नमुद केलेले असुन त्यांचा रि-सर्व्हे मोजणी नंबर १८ हा सर्व्हे नंबर आहे.

**प्रतिवादीतर्फे वकील श्री. गलांडे यांच्या लेखी अर्जावरून उर्वरित सरतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब करण्यात आला.**

वा.दा.ब.अ.सा. समक्ष

(आर.एस.मानकर)
२रे सह दिवाणी न्यायालय क.स्तर,उमरेड
दि २७.०४.२०२६

(आर.एस.मानकर)
२रे सह दिवाणी न्यायालय क.स्तर,उमरेड
उमरेड